**मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक येथील ५७ दुरुस्ती कामांना/अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: दुरुस्ती/प्रमा २०२१/प्र.क्र.१११/जल-१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक: २२ जून, २०२१**

वाचा:

१. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.कोपबं -२०१८/प्र.क्र.१८३/ जल-०१, दि.२०/७/२०१८.
२. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.लपायो -२०१८/प्र.क्र.१७७/ जल-०१, दि.२०/७/२०१८.
३. शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.लपायो१०९९/प्र.क्र.३४७/जल-१, दि.३१/७/२०००.
४. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.मुजयो-२०२०/प्र.क्र.७६/जल-०१, दि.१७/०२/२०२१.
५. अपर आयुक्त तथा मुख्य अभियंता,मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, औरंगाबाद यांचे पत्र क्र अआऔ/दुरूस्ती/ताशा/११४/११५/११८/११९/१२३/१२४/१६८/१७०/१७१/१८५/१८८/१८७ /१८९/२०४/२३२/१६८, दि.२२.०१.२०२१

**प्रस्तावना**

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत राज्यातील पूर्ण झालेल्या जलसंधारण योजनांपैकी देखभाल व दुरुस्ती आवश्यक असलेल्या योजनांचे परिरक्षण व दुरुस्ती करुन सिंचन क्षमता पुर्नस्थापित करण्याच्या अनुषंगाने जलसंधारण उपचार बांधकामांची दुरुस्ती प्रस्तावित आहे. नाशिक मंडळ कार्यालयांतर्गत एकूण ५७ योजनांची दुरुस्ती करण्यात येणार असून ५७ योजनांपैकी ५ योजना प्रथम प्राधान्यक्रमात असुन बाकी ५२ योजना व्दितीय प्राधान्यक्रमात सामाविष्ठ आहेत. दुरुस्तीसाठी एकूण रक्कम ८.०२९१ कोटी इतकी आहे. या प्रकल्पांची दुरुस्ती झाल्यावर १६३८.१४ हेक्टर सिंचन क्षेत्र व ७२७६.९७ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित होणार आहे. सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचे प्रस्ताव अपर आयुक्त तथा मुख्य अभियता , जलसंधारण औरंगाबाद यांनी शासनास सादर केला आहे. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक यांनी आपल्या स्तरावर सर्व अंदाजपत्रकांची छाननी/तपासणी केली असून तसे प्रमाणित केले आहे. उपरोक्त बाबींचा विचार करून उल्लेखित ५७ कामांच्या दुरुस्ती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याचे विचाराधीन होते. त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

नाशिक प्रादेशिक जलसंधारण विभागातील एकूण ५७ दुरुस्ती योजनांची अंदाजपत्रकीय किंमत रुपये ८.०२९१ कोटी (अक्षरी रुपये आठ कोटी दोन लक्ष एक्याण्णव हजार फ़क्त) इतकी आहे. या किंमतीच्या अंदाजपत्रकांना खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) उपरोक्त पैकी प्रत्येक योजनेस स्वतंत्ररित्या प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. आदेश एकत्रित केलेला आहे.

२) पाणी वापर संसथा स्थापन करण्यासाठी ठेकेदारास निविदेत अटी घालून बंधनकारक करण्यात यावे. WUA स्थापन होईपर्यंत निविदेच्या १०% रक्कम ठेकेदाराच्या देयकातून कपात करण्यात यावी. संस्था स्थापन झाल्यानंतर सदरची रक्कम वितरित करण्यात यावी. अपवादात्मक परीस्थितित संस्था स्थापित होऊ शकत नसल्यास सविस्तर कारणमीमांसेसह प्रस्ताव शासनास सादर करून शासनाच्या मान्यते नंतर कपात केलेली १०% निधी वितरित करण्यात यावा. पाणी वापर संस्था स्थापन केल्या बद्दल ठेकेदारास मृद व जलसंधारण विभाग शा.नि.क्र: लपायो-२०१८/प्र.क्र:१७७/जल-१ दिनांक २०-०७-२०१८ मधील भाग C नुसार मानधन देण्यात यावे.

३) शासन निर्णय दिनांक २०-०७-२०१८ मधील तरतुदीनुसार दुरुस्ती करण्यात यावी.

४) दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी यांनी तांत्रिक मान्यता द्यावी.

५) दुरुस्तीच्या कामाचा दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) हा ५ वर्ष राहील.

६) दुरुस्तीच्या कामांचे Geotag व वेळेसह व्हिडीओ चित्रीकरण बंधनकारक राहील.

a) काम सुरू करण्यापूर्वी

b) २५% पूर्ण झाल्यानंतर.

c) ५०% काम पूर्ण झाल्यानंतर.

d) ७५% काम पूर्ण झाल्यानंतर.

e) १००% काम पूर्ण झाल्यानंतर.

या कामात पाच टप्प्यात Geotag व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे. प्रत्येक टप्प्याच्या व्हिडिओ चित्रीकरणाचा कालावधी किमान ३ मिनिटाचा आवश्यक राहील.

i) काम सुरू करण्यापूर्वी एका बाजूने चित्रीकरण सुरुवात करून दुसऱ्या टोकापर्यंत संपूर्ण चित्रीकरण करण्यात यावे.

ii) व्हिडीओ चित्रीकरण करताना प्रत्येक वेळेस कामाचे जलसंधारण अधिकारी व कंत्राटदार/ त्यांचा प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे. किमान दोन वेळेस खुद्द कंत्राटदाराची उपस्थिती आवश्यक आहे.

iii) चित्रीकरणांमध्ये किमान दोन टप्प्यांमध्ये उप अभियंता व एका टप्प्यामध्ये कार्यकारी अभियंता यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

iv) देयके पारित करताना मोजमाप पुस्तिका सोबत चित्रीकरणाचा PenDrive सादर करावा. तसे मोजमाप पुस्तिकेत नमूद करावे.

v) सदर चित्रीकरणाची प्रत कार्यकारी अभियंता यांनी तपासावी व वरील सूचनांप्रमाणे चित्रीकरण नसल्यास देयक पारित करून होणार नाही.

vi) चित्रीकरणाची किमान १५ सेकंदांची संक्षिप्त प्रत विभागाच्या जिओपोर्टलवर Upload करण्यात यावी.

७) कामाची गुणवत्ता उत्तम दर्जाची राहील याची सर्वस्वी जबाबदारी जलसंधारण अधिकारी/ उपविभागीय जलसंधारण अधिकारी/ जिल्हा जलसंधारण अधिकारी यांची राहील. गुणनियंत्रण चाचण्या मापदंडानुसार करण्यात याव्यात.

८) क्रॉस चेकिंगसाठी इतर विभागाच्या अखत्यारीतील उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी दुरुस्तीचे काम सुरू असताना तपासणी करावयाची आहे. त्यांची नियुक्ती प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनी करावी.

९) काम पूर्ण झाल्यानंतर कामाची गुणनियंत्रणाच्या दृष्टीने विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण पथकाकडून तपासणी करण्यात यावी.

१०) ज्या योजनांची अंदाजपत्रकीय किंमत/ दुरुस्तीचा खर्च हा २० % पेक्षा जास्त येत असेल अशा योजनांची दुरुस्तीची अंमलबजावणी शासन निर्णय २०.०७.२०१८ मधील मार्गदर्शक सुचना क्र. ७(१) मधील तरतूदीनुसार करण्यात यावी.

११) गाळ काढण्याचे काम हे लोकसहभागातून, रोहयोतून किंवा यांत्रिकी विभागामार्फ़त करण्यात यावे.

१२) कामांची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा जलसंधारण अधिकारी व उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांची राहिल.

१३) सदर दुरुस्तीचे प्रस्ताव प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांचे स्तरावर तपासणी केली असल्याने प्रस्तावात अपूर्ण माहिती किंवा चूकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास यास सर्वस्वी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी व त्यांचे अखत्यारीतील संबंधीत क्षेत्रीय अधिकारी जबाबदार राहतील.

१४) केलेल्या कामाचा तपशील ग्रामसभेसमोर ठेवण्यात यावा.

**२.०** या ५७ योजनांच्या कामावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**१. ० ते १०० हे. सिंचन क्षमतेच्या योजनांकरिता लेखाशिर्षः-**

**लेखाशिर्ष ४७०२-ए०४६**

**(०२)(०१) लहान पाटबंधारे योजना**

**० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता परिरक्षण व दुरुस्ती(कार्यक्रम)**

**५३, मोठी बांधकामे**

**२. १०१ ते २५० हे. सिंचन क्षमतेच्या योजनांकरिता लेखाशिर्षः**

**लेखाशिर्ष ४७०२-ए०५५**

**(०२)(०२) लहान पाटबंधारे योजना**

**१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमता परिरक्षण व दुरुस्ती (कार्यक्रम)**

**५३, मोठी बांधकामे**

**३.०** सदरहू योजनांच्या दुरुस्तीच्या कामास वरील लेखाशिर्षांतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**४.०** प्रस्तुत आदेश प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२१०६२२१२४५२८१६२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJAY MAGAN DEORAJ

Digitally signed by VIJAY MAGAN DEORAJ
DN: CN = VIJAY MAGAN DEORAJ, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT
Date: 2021.06.22 13:02:09 +05'30'

**(वि. म. देवराज)**
**अधिक्षक अभियंता तथा पदसिध्द उप सचिव**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मंबई.
२) मा. मुख्यमंत्री, यांचे अप्पर मुख्य सचिव.
३) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
४) सर्व मा. संसद सदस्य, विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खासगी सचिव
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८) मा. मंत्री ( मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
९) मा. राज्य मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
१०) सचिव (मृद व जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक
११) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) आयुक्त मृद व जलसंधारण, जल आयुक्तालय, औरंगाबाद.
१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, धुळे, अहमदनगर.
१५) अपर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, प्रादेशिक क्षेत्र, औरंगाबाद.
१६) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक.
१७) प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद.
१७) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक, धुळे, अहमदनगर.
१८) जिल्हा जलसंधारण अधिकारी, (ल.पा.) जिल्हा परिषद नाशिक, धुळे, अहमदनगर.
१९) कार्यासन अधिकारी (जल-४), जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवड नस्ती (जल-१).

**मृद व जलसंधारण विभाग**

**जोडपत्र 'अ'**

**अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, प्रादेशिक क्षेत्र नाशिक यांचे अधिपत्याखालील प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक यांचे अंतर्गत राज्य स्तर व जिल्हा परिषद या विभागांतर्गतच्या जलसंधारण उपचार बांधकामाच्या आवश्यक दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा गोषवाराः-**

**शासन निर्णय क्रमांक: दुरुस्ती/प्रमा २०२१/प्र.क्र. १११/जल-१ दिनांकः- २२ जून, २०२१.**

| अ. क्र | कामाचे नाव | गाव | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | कार्यान्वयीन विभाग | सिंचन क्षमता (हेक्टर) | पाणीसाठा (सघमी) | दुरुस्तीची प्रस्तावित किंमत रुपये लक्ष | आराखड्यात आहे किंवा नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | द.सा.बं. दुरुस्ती (ग. न १८) | देवसडे | अहमदनगर | नेवासा | जलसंधारण | १६.०० | ८२.०० | २.५२ | २ |
| २ | द.सा.बं. दुरुस्ती (ग. न ५३१) | माका | अहमदनगर | नेवासा | जलसंधारण | ११.३० | १३ | ०.३२ | २ |
| ३ | द.सा.बं. दुरुस्ती (ग. न ४६) | नेवासा खु. | अहमदनगर | नेवासा | जलसंधारण | १६.३७ | ८८ | ०.५९ | २ |
| ४ | द.सा.बं. दुरुस्ती (गुरुकुल शाळेजवळ) | घोडेगाव | अहमदनगर | नेवासा | जलसंधारण | १२.०० | ७३ | ०.९० | २ |
| ५ | द.सा.बं. दुरुस्ती (गावशिव) | नांदूर सूकळी | अहमदनगर | नेवासा | जलसंधारण | १८.०० | ७३ | २.७८ | २ |
| ६ | सि.कॉ.बं (पवार शेत) | चिलेखनवाडी | अहमदनगर | नेवासा | जलसंधारण | १३.४१ | ७४.०० | ११.६१ | २ |
| ७ | पाझर तलाव दुरुस्ती | जांभळी | अहमदनगर | पाथर्डी | जलसंधारण | ७३.०० | ३६४.०० | ४.१९ | २ |
| ८ | पाझर तलाव दुरुस्ती | बडेवाडी | अहमदनगर | पाथर्डी | जलसंधारण | ९९.५८ | ४७०.०० | १९.३७ | २ |
| ९ | द.सा.बं. दुरुस्ती -१ (शेळके ढोंगरे वस्ती) | शिंगवे | अहमदनगर | राहता | जलसंधारण | १२.०० | ५४.०० | ४.४० | २ |
| १० | द.सा.बं. दुरुस्ती (शेळके कावे वस्ती) | शिंगवे | अहमदनगर | राहता | जलसंधारण | ८.०० | ४०.०० | २.८० | २ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | द.सा.बं. दुरुस्ती | को-हाळे | अहमदनगर | राहता | जलसंधारण | १५.०० | ४६.०० | २.३० | २ |
| १२ | पाझर तलाव दुरुस्ती | चिंचळे | अहमदनगर | राहुरी | जलसंधारण | ३३.४८ | १२५.६० | ७.१७ | २ |
| १३ | पाझर तलाव दुरुस्ती | गुहा | अहमदनगर | राहुरी | जलसंधारण | १३.९५ | ६६.४० | ७.२२ | २ |
| १४ | पाझर तलाव दुरुस्ती | वडनेर | अहमदनगर | राहुरी | जलसंधारण | १३.२५ | ६७.०० | ८.५३ | २ |
| १५ | पाझर तलाव दुरुस्ती | सोनुशी | नाशिक | इगतपुरी | जलसंधारण | ४८ | १८२.९८ | ४१.५७ | २ |
| १६ | साठवण बंधारा | विरखेल | धुळे | साक्री | जलसंधारण | २७.७० | ४०.०० | ८.४९ | २ |
| १७ | साठवण बंधारा क्र. १ | छावडी | धुळे | साक्री | जलसंधारण | १२.५० | ५०.०० | ११.४७ | २ |
| १८ | साठवण बंधारा क्र. २ | छावडी | धुळे | साक्री | जलसंधारण | १२.५० | ४५.०० | ११.८९ | २ |
| १९ | पाझर तलाव दुरुस्ती | साकेवाडी उदरमल | अहमदनगर | नगर | जलसंधारण | ६२.०० | २९३.०० | ३९.३० | २ |
| २० | पाझर तलाव दुरुस्ती | रांजणी (झिरपी नाला) | अहमदनगर | नगर | जलसंधारण | ३०.०० | १४२ | २८.५३ | २ |
| २१ | पाझर तलाव दुरुस्ती | रांजणी (चुनखडी) | अहमदनगर | नगर | जलसंधारण | २९.०० | १३७ | १४.४६ | २ |
| २२ | पाझर तलाव दुरुस्ती | देऊळगाव सिद्दी (सुतार्डीका) | अहमदनगर | नगर | जलसंधारण | ३०.०० | १४२ | ३४.६६ | २ |
| २३ | पाझर तलाव दुरुस्ती | पोरवाडी (वडदरा) | अहमदनगर | नगर | जलसंधारण | ३६.०० | १७० | १९.९३ | २ |
| २४ | दगडी साठवण बंधारा दुरुस्ती | गोगलगाव | अहमदनगर | राहता | जलसंधारण | १२.०० | ५८ | २.२८ | २ |
| २५ | दगडी साठवण बंधारा दुरुस्ती | अस्तगाव | अहमदनगर | राहता | जलसंधारण | १४.०० | ४८ | २.६४ | २ |
| २६ | दगडी साठवण बंधारा दुरुस्ती | शहापुर | अहमदनगर | कोपरगाव | जलसंधारण | १५.०० | ७४.०० | २.८३ | २ |
| २७ | दगडी साठवण बंधारा दुरुस्ती | कोळपेवाडी | अहमदनगर | कोपरगाव | जलसंधारण | १५.०० | ५०.०० | २.९५ | २ |
| २८ | दगडी साठवण बंधारा दुरुस्ती | वारी | अहमदनगर | कोपरगाव | जलसंधारण | १२.०० | ५६.०० | ४.४२ | २ |
| २९ | दगडी साठवण बंधारा दुरुस्ती | पोहेगाव | अहमदनगर | कोपरगाव | जलसंधारण | १२.०० | ४६.०० | १.९४ | २ |
| ३० | दगडी साठवण बंधारा दुरुस्ती | बहादराबाद | अहमदनगर | कोपरगाव | जलसंधारण | ४.०० | ५६.०० | २.५५ | २ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | साठवण बंधारा दुरुस्ती | मढी बु | अहमदनगर | कोपरगाव | जिल्हा परिषद | ९.०० | ५०.०० | ८.१५ | २ |
| ३२ | पाझर तलाव दुरुस्ती | मिर्झापूर | अहमदनगर | संगमनेर | जिल्हा परिषद | २२.०० | १०२.०० | २०.०४ | २ |
| ३३ | पाझर तलाव दुरुस्ती | पेमगिरी(मोर दरा) | अहमदनगर | संगमनेर | जिल्हा परिषद | ५२.०० | २४७.०० | ३०.११ | २ |
| ३४ | पाझर तलाव दुरुस्ती | पानोडी (लगडदरा) | अहमदनगर | संगमनेर | जिल्हा परिषद | २८.०० | १३५.०० | २६.११ | २ |
| ३५ | पाझर तलाव दुरुस्ती | बीरेवाडी (मांडवे) | अहमदनगर | संगमनेर | जिल्हा परिषद | २९.०० | १३९.०० | २१.८५ | २ |
| ३६ | पाझर तलाव दुरुस्ती | घारगाव (कळमजाई) | अहमदनगर | संगमनेर | जिल्हा परिषद | ६०.०० | २८५.०० | २३.५९ | २ |
| ३७ | पाझर तलाव दुरुस्ती | सायखिंडी | अहमदनगर | संगमनेर | जिल्हा परिषद | ३८.०० | १८१.०० | १५.३१ | २ |
| ३८ | पाझर तलाव दुरुस्ती | भोंद्रे (मकई दरा) | अहमदनगर | पारनेर | जलसंधारण | १५.०० | ७०.०० | ११.३१ | २ |
| ३९ | पाझर तलाव दुरुस्ती | हंगा (चिमटा) | अहमदनगर | पारनेर | जलसंधारण | २६ | १२०.०० | २६.११ | २ |
| ४० | पाझर तलाव दुरुस्ती | कासारे नं-१ | अहमदनगर | पारनेर | जलसंधारण | ४२ | १९६.०० | २९.१३ | २ |
| ४१ | पाझर तलाव दुरुस्ती | काकणेवाडी (वाघदरा) | अहमदनगर | पारनेर | जलसंधारण | ३४ | १६२.०० | १३.५९ | २ |
| ४२ | पाझर तलाव दुरुस्ती | काकणेवाडी (टुबुकदरा) | अहमदनगर | पारनेर | जलसंधारण | १५ | ७०.०० | १२.४२ | २ |
| ४३ | पाझर तलाव दुरुस्ती | पाडळी आळे( गवळीबाबा) | अहमदनगर | पारनेर | जलसंधारण | १८ | ८४.०० | १९.२५ | १ |
| ४४ | पाझर तलाव दुरुस्ती | हिवरे कोरडा | अहमदनगर | पारनेर | जलसंधारण | ४९ | २३२.०० | १६.४८ | १ |
| ४५ | पाझर तलाव दुरुस्ती | लोहसर (पवळवाडी) | अहमदनगर | पाथर्डी | जिल्हा परिषद | ६०.०० | २८०.०० | ३२.८५ | २ |
| ४६ | पाझर तलाव दुरुस्ती | पुणेगाव | नाशिक | दिंडोरी | जिल्हा परिषद | ५०.४० | २३७.८९ | २९.९८ | १ |
| ४७ | पाझर तलाव दुरुस्ती | उमराळे बु. | नाशिक | दिंडोरी | जिल्हा परिषद | ५३.९४ | २५४.६० | ४५.८७ | २ |
| ४८ | साठवण बंधारा दुरुस्ती | असलाद-५ | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | ८.०० | २१.०० | ६.८८ | १ |
| ४९ | साठवण बंधारा दुरुस्ती | कळंबू | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | ९.०० | २६.०० | ८.४३ | २ |
| ५० | साठवण बंधारा दुरुस्ती | जवखेडा | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | ७.०० | २३.०० | ७.२३ | १ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | साठवण बंधारा दुरुस्ती | कलमाड-१ | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | १.६९ | १०.५० | ३.३७ | २ |
| ५२ | साठवण बंधारा दुरुस्ती | कलमाड-२ | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | १.०७ | १०.०० | २.९२ | २ |
| ५३ | साठवण बंधारा दुरुस्ती | माटकूट-१ | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | ६.०० | १८.०० | ४.०९ | २ |
| ५४ | साठवण बंधारा दुरुस्ती | माटकूट-३ | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | ३.०० | १६.०० | ३.६२ | २ |
| ५५ | साठवण बंधारा दुरुस्ती | माटकूट-४ | नंदुरबार | शहादा | जलसंधारण | ३.०० | १५.०० | ३.५८ | २ |
| **० ते १०० हेक्टर** | | | | | | **१३६७.१४** | **६२१०.९७** | **७२६.८७** | |
| | | | | | | | | | |
| ५६ | पाझर तलाव दुरुस्ती | चिंचेवाडी | अहमदनगर | संगमनेर | जिल्हा परिषद | १५९.०० | ५३६ | २६.७५ | २ |
| ५७ | पाझर तलाव दुरुस्ती | कोलार क्र.१ | अहमदनगर | पाथर्डी | जिल्हा परिषद | ११२.०० | ५३०.०० | ४९.२९ | २ |
| **१०१ ते २५० हेक्टर** | | | | | | **२७१.००** | **१०६६.००** | **७६.०४** | |
| **० ते २५० हेक्टर** | | | | | | **१६३८.१४** | **७२७६.९७** | **८०२.९१** | |

( एकूण अक्षरी आठ कोटी दोन लक्ष एक्याणणव हजार फक्त )

VIJAY MAGAN DEORAJ

Digitally signed by VIJAY MAGAN DEORAJ
DN: CN = VIJAY MAGAN DEORAJ, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT
Date: 2021.06.22 13:02:37 +05'30'

(वि. म. देवराज)
अधिक्षक अभियंता तथा पदसिध्द उप सचिव
महाराष्ट्र शासन